# फळसेवाडी हितकारी संस्था
## वार्षिक सर्वसाधारण सभा

**दिनांक** : रविवार 16 मे 1999
**स्थळ** : शिरोडकर हायस्कुल, परेल

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. श्री प्रताप विठोबा राणे | 5. श्री रंजन रावजी म्हसकर |
| 2. श्री सुनिल सदानंद राणे | 6. श्री चंद्रकान्त सावंत |
| 3. श्री मनोहर भिकाजी राणे | 7. श्री आनंद नारायण साटम |
| 4. श्री शंकर बाळकृष्ण राणे | 8. श्री हेमंतकुमार रमेश राणे |

उपस्थितांचे आभार मानून गणसंख्येच्या अभावी तहकूब केलेली सभा सायंकाळी 6:30 वाजता शिरोडकर हायस्कूल, परेल या ठिकाणी सुरु झाली. अध्यक्ष श्री प्रताप विठोबा राणे यांनी सभा सुरु केली. अध्यक्षांनी कार्यक्रम पत्रिकेवरील विषय सुचिस सुरवात करण्यापूर्वी पुढील ठराव मांडण्यात आले.

1. माननिय श्री नारायणराव राणे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन
2. श्री प्रताप विठोबा राणे यांची विशेष कार्यकारी अधिकारी (एस ई ओ) म्हणून नियुक्ती व त्यांना या वर्षात संत रोहिदास पुरस्कार, आय सी एस पुरस्कार, डॉ बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार (एकता पुरस्कार) प्राप्त झाले त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.
3. सौ प्रिता प्रताप राणे यांचे साहित्य 'निलांबरी' या दिवाळी अंकास उत्तेजनार्थ दर्पण पुरस्कार मिळाला त्याबद्दल त्यांचेही अभिनंदन करण्यात आले.
4. श्री उत्तम वामन रावराणे यांच्या व्दितीय 'स्पर्श' चारोळी कविता संग्रह प्रकाशित करण्यात आला त्याबद्दल त्यांचेही अभिनंदन करण्यात आले.

तसेच संस्थेने पुढील व्यक्तींच्या मृत्यूबद्दल दोन मिनीटे उभे राहून श्रध्दांजली वाहिली.
(1) कै वासुदेव बाबू राणे (संस्थेचे माजी अध्यक्ष) (2) कै शिवाजी त्रिंबक राणे (3) कै राधाबाई बाळकृष्ण राणे
(4) कै अहिल्याबाई रघुनाथ राणे (5) कै प्रमोद वासुदेव राणे
ईश्वर मृतात्म्यांस शांती देवा ही प्रार्थना

तद्नंतर सभेपुढील विषय सूची नुसार कामकाजास सुरवात करण्यात आली.

1. विषय क्रमांक 1
   दिनांक 12 एप्रिल 1998 रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून सर्वानुमते मंजूर करण्यात आले.
2. सन 1998-99 या कालावधीत चिटणीसांनी केलेल्या कामकाजास मंजूरी देणे.
   सर्वानुमते मंजूर करण्यात आला.
3. सन 1998-99 या जमाखर्चास मंजूरी देणे

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-02-(16 to 21)

सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

4. पुढील कालावधीसाठी कार्यकारीणीची निवड करणे
   गणसंख्येच्या अभावी पुढील कालावधीसाठी तीच कार्यकारीणी ठरविण्यात आली.

पुढे कालावधीसाठी कार्यकारिणी

1. श्री प्रताप विठोबा राणे — अध्यक्ष
2. श्री रामकृष्ण भगवान राणे — उपाध्यक्ष
3. श्री सुनिल सदानंद राणे — चिटणीस
4. श्री उदय भगवान राणे — खजिनदार

कार्यकारिणी सदस्य

1. श्री मधुसूदन श्रीधर राणे
2. श्री पांडूरंग सावजी राणे
3. श्री रमेश रघुनाथ राणे
4. श्री भास्कर दौलत राणे
5. श्री शंकर बाळकृष्ण राणे
6. श्री महादेव गंगाराम राणे
7. श्री दिलीप मधुकर राणे

सल्लागार

1. श्री दत्ताराम विष्णु साटम
2. श्री अविनाश कृष्णाजी राणे

हिशेब तपासणीस

1. श्री अविनाश बाळकृष्ण राणे
2. श्री प्रशांत काशिनाथ राणे

वाडीतील सुधारणा होणेबाबत चर्चा करण्यात आली. परंतू त्यासाठी नवीन मंडळी सभासद या संस्थेच्या कामकाजासाठी पुढे येण्यासाठी तयार होते नाहीत अशी खंत व्यक्त केली.

अध्यक्षांनी सभाग्रहास सांगितले की ब्राह्मण मंदिर बांधण्याचे काम सुरू असून ज्या व्यक्तिनां रु.101/- प्रमाणे मदत द्यावयाची असेल त्यांनी द्यावी. याप्रमाणे खालील प्रमाणे मदत गोळा झाली. व श्री मनोहर भिकाजी राणे यांचे मार्फत श्री सुरेश रघुनाथ राणे यांच्याकडे पाठविण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे खालील वर्गणी गोळा झाली.

(1) श्री हेमंतकुमार रमेश राणे – रु.201/- (2) श्री आनंद नारायण साटम – रु.201/-
(3) श्री मनोहर भिकाजी राणे – रु.251/- (4) श्री सुनिल सदानंद राणे – रु.101/-
(5) श्री गुरुनाथ गणपत राणे – रु.101/- (6) श्री दशरथ शिवाजी राणे – रु.101/-
(7) श्री शंकर बाळकृष्ण राणे – रु.201/-

एकूण जमा रु.1157/- संपूर्ण जमा रक्कम श्री सुरेश रघुनाथ राणे यांचेकडे पाठविण्यात आली.

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-02-(16 to 21)

बाकी सभासदांना लवकर पैसे देण्याची विनंती करण्यात आली. या मंदिर बांधणीसाठी मोठ्या रक्कमेची गरज होती ही मोठी रक्कम श्री रंजन रावजी राणे यांच एडव्होकेट यांचे मार्फत श्री सुरेश रघुनाथ राणे यांना पाठविण्याची व्यवस्था झाली याबद्दल श्री रंजन रावजी राणे व एडव्होकेट, महामंत्री भाजपा (कांदिवली) यांचे संस्थेमार्फत आभार मानण्यात आले. तसेच गावी हे मंदिर बनविण्यासाठी श्री सुरेश रघुनाथ राणे, श्री अंकुश मारुती राणे, श्री नाना राजाराम राणे, श्री रत्नाकर नाना राणे  इत्यादीनी भाग घेतला त्यांचेही आभार मानण्यात आले.

माननिय नामदार नारायणराव राणे, मुख्यमंत्री यांचा 18 एप्रिल 1997 (सन 1997) रोजी म्युनिसिपल स्कुल डिलाईल रोड येथे सत्कार करण्यात आला होता, त्यावेळी "आमंत्रण केटरर्स" या संस्थेचे रु.5000/- देणे बाकी होते. अश्यावेळी हे देणे अत्यंत महत्वाचे होते म्हणून संस्थेने असा निर्णय घेतला की आजन्म सभासद म्हणून रु.1000/- म्हणून घेऊन हे पैसे परत करावेत. त्याप्रमाणे श्री प्रताप विठोबा राणे, श्री सुनिल सदानंद राणे, श्री रामकृष्ण भगवान राणे, श्री सुरेश रघुनाथ राणे आणि श्री उदय भगवान राणे यांनी प्रत्येकी रु.1000/- दिले व त्यांना आजन्म सभासद मान्यता द्यावी असा प्रस्ताव अध्यक्षांनी मांडला व त्याला सभासदांनी एकमुखाने मान्यता दिली व खजिनदारांनी त्याप्रमाणे रु.1000/- ची पावती बनवानी असे ठरले.

नळपाणी योजनेमार्फत पाण्याची सोय व्हावी यासाठी मा नामदार श्री नारायणराव राणे यांना निवेदन द्यावे असे ठरले.

ही सभा संध्याकाळी 8:00 वाजता सर्वांचे आभार मानून संपल्याचे जाहिर केले. या सभेच्या चहापाण्याचा खर्चाचा भार ज्यांनी उचलला त्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले.

---